# जाहीर सुचना

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून विजतंत्री/तारतंत्री/माहिती तंत्रज्ञान व कोपा या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांना सुचित करण्यात येते की, महावितरण, नागपूर शहर मंडलांतर्गत वर्ष २०२६-२०२७ करीता शिकाऊ उमेदवारांना एक वर्ष कालावधीसाठी करारबध्द करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी http://www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर शिकाऊ उमेदवारी करिता दिनांक **०६.०७.२०२६ (००.०० तासांपासून) ते दिनांक १३.०७.२०२६ (२४.०० तासांपर्यंत)** विभागानिहाय/मंडल निहाय आस्थापना नोंदणी क्रमांकावर ऑनलाइन (online) अर्ज करावे. नागपूर शहर मंडल, नागपूरचे अंर्तगत असलेल्या विभागांचे आस्थापना नोंदणी क्रमांक व भरावयाची पद खालील प्रमाणे आहेत.

| अक्र | मंडलांचे नांव | आस्थापना नोंदणी क्रमांक | कोपा | माहिती तंत्रज्ञान | तारतंत्री | विजतंत्री |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागपूर शहर मंडल, नागपूर | E03212700269 | १२ | ५ | ० | ० |
| २ | कॉग्रेस नगर विभाग, नाशमं नागपूर | E01172700851 | ६ | ० | १२ | ३७ |
| ३ | गांधीबाग विभाग, नाशमं नागपूर | E12202700141 | ३ | ० | ६ | ११ |
| ४ | महाल विभाग, नाशमं नागपूर | E12202700098 | ७ | ० | ९ | १६ |
| ५ | सिव्हिल लाईन विभाग, नाशमं नागपूर | E12202700087 | ४ | ० | ८ | १४ |
| ६ | बुटीबोरी विभाग, नाशमं नागपूर | E01172700441 | ३ | ० | ६ | २९ |

**(१) शैक्षणिक अर्हता -** १) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण, २) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून आयटीआय विजतंत्री/तारतंत्री/माहिती तंत्रज्ञान/कोपा या व्यवसायात परीक्षा उत्तीर्ण.

**(२) शैक्षणिक दस्ताऐवज - १)** एस.एस.सी. व आय.टी.आय. विजतंत्री/तारतंत्री/माहिती तंत्रज्ञान चार सेमिस्टर व कोपा या व्यवसायातील दोन सेमिस्टरची उत्तीर्ण गुणपत्रिकाची मूळप्रत, २) आधारकार्ड व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र व रहिवासी प्रमाणपत्र व इतर सर्व अनुषंगिक आवश्यक कागदपत्रांची मुळप्रत उमेदवारांने स्वत:च्या प्रोफाईलवर स्कॅन करुन अपलोड करावे.

**(३) विद्यावेतन -** प्रचलित नियमाप्रमाणे लागू राहिल. **(४) वयोमर्यादा -** दिनांक **३०.०६.२०२६** पर्यंत वय १८ ते ३५ वर्ष आवश्यक वरील शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवाराची नोंदणी ग्राहय धरल्या जाईल. (५) नमुद पद संख्या कमी-अधिक करण्याचे व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापन राखून ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारांस कळविल्या जाणार नाही. (६) भरती प्रक्रियेदरम्यान उमेद्वाराने राजकिय किंवा इतर अधिकाऱ्यांकडून दबाव आणल्यास आपली उमेद्वारी रद्द करण्यात येईल. (७) वरील कालावधीत ऑनलाईन (online) अर्ज सादर न केल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही. (८) शिकाऊ उमेदवारांची निवड ही एस.एस.सी व आय.टी.आय गुणांच्या टक्केवारीनुसार (अनुक्रमे ४० टक्के व ६० टक्के) अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रवर्गनिहाय निवड केली जाईल. (९) शासन निर्णयानुसार अनुसुचित जाती या प्रवर्गाकरीता १:१० व अनुसुचित जमाती या प्रवर्गाकरीता १:११ या प्रमाणानुसार पदे राखीव व महिलांकरीता शासन निर्णयानुसार पदे राखीव राहतील. (१०) तसेच, उमेद्वारांनी संकेतस्थळावर Online Registration ची नोंदणी केल्याची प्रत (www.apprenticeshipindia.org) व शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या गुणपत्रिका/ प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली छायांकित प्रतीसह आपला अर्ज व सर्व दस्ताऐवज दिनांक **०६.०७.२०२६ ते १३.०७.२०२६** पर्यंत संबंधीत कार्यालयास सादर करावे. जे उमेद्वार आपले संपूर्ण दस्ताऐवजसह संबंधित कार्यालयास अर्ज सादर करणार नाहीत त्या उमेद्वारांची प्रशिक्षणाकरिता निवड करण्याबाबत विचार करण्यात येणार नाही. (११) नागपूर जिल्हया अंतर्गत रहिवासी असलेल्या उमेद्वाराना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

**Nagpur Zone / PRO No. 104 dtd. 02.07.2026** **अधीक्षक अभियंता, संवसु मंडळ, मराविविकंम, नागपूर शहर**